आत्मदीपो भव!

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

# राजकीय नेतृत्व प्रशिक्षण



आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

## व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| देवेंद्र फडणवीस | अध्यक्ष |
| डॉ. विनय सहस्रबुद्धे | उपाध्यक्ष |
| विजय (भाई) गिरकर | सचिव |
| अरविंद रेगे | कोषाध्यक्ष |
| प्रा. अनिरुद्ध देशपांडे | सदस्य |
| वी. सतीश | सदस्य |
| रेखा महाजन | सदस्या |
| रामस्वामी बालासुब्रमण्यम | सदस्य |
| श्रीकांत बडवे | सदस्य |
| सुधीर मेहता | सदस्य |
| प्रदीप पाण्डेय | सदस्य |

| | |
|---|---|
| डॉ. जयंत कुलकर्णी | कार्यकारी संचालक |

Society Registration Act (Registration No. 618 Bom. /82)
Trust Act (Registration No. F-7863 Bom. /82)
80G - Certificate No. AAATR3174JF20072 Valid upto AY 2026-2027
12A - Certificate No. AAATR3174JE19829 Valid upto AY 2026-2027
• FCRA No. 083780667 • PAN No.: AAATR3174J
• TAN No.: MUMR16886C • GST No.: 27AAATR3174J1ZA

# राजकीय नेतृत्व प्रशिक्षण

**कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी प्रशिक्षण**

## प्रबोधिनीविषयी




रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी गेली सुमारे ४२ वर्षे प्रशिक्षण, प्रबोधन आणि संशोधन या त्रिसूत्रीसह प्रामुख्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, तालुका – जिल्हा – राज्य स्तरावरील पदाधिकारी, तसेच अनेक स्तरांवरील लोकप्रतिनिधी या सर्वच घटकांसाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी दर्जेदार आणि सकस प्रशिक्षण कार्यक्रम योजते. विविध पक्षांच्या हजारो कार्यकर्त्यांनी आतापर्यंत प्रबोधिनीच्या प्रशिक्षण कार्यक्रमांतून प्रेरणा घेतली आहे. केशवसृष्टी, उत्तन येथील निसर्गसुंदर, अत्याधुनिक आणि सुसज्ज ज्ञान – नैपुण्य केंद्र हे तर म्हाळगी प्रबोधिनीचे प्रमुख वैशिष्ट्य!

कार्यकर्त्यांना व्यक्तिमत्त्व विकास व कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आणि राजकीय कार्यासाठी लोकशाहीविषयक घटकांचे प्रशिक्षण प्रबोधिनीत सुनियोजित पद्धतीने दिले जाते. प्रशिक्षणाच्या माध्यमातून नेतृत्व विकास आणि क्षमता संवर्धन घडवणारी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही अभिनव संस्था आहे. तसेच एकूण राजकीय क्षेत्राला वेगळा आयाम आणि दृष्टिकोन देणारीही प्रबोधिनी ही भारतातील एकमात्र संस्था आहे.

विविध राजकीय-सामाजिक-व्यक्तिविकासात्मक विषयांबाबत मान्यवर तज्ज्ञ आणि अनुभवी अभ्यासक यांचे प्रेरक आणि दिशादर्शक मार्गदर्शन हे म्हाळगी प्रबोधिनीचे बलस्थानच आहे.

## पार्श्वभूमी

समाजजीवनाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि त्यातील कार्यक्षम मनुष्यबळासाठी 'प्रशिक्षण हा एक महत्त्वाचा घटक' ठरतो. सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक इत्यादी क्षेत्रांसह राजकीय क्षेत्रातही प्रशिक्षित मनुष्यबळ अत्यावश्यक आहेच.

स्वराज्य ते सुराज्य आणि स्वातंत्र्य ते सुशासन हा प्रवास अधिकाधिक यशस्वी आणि परिणामकारक करायचा असेल, तर लोकशाहीच्या दृष्टीने प्रशिक्षित कार्यकर्ता-लोकप्रतिनिधी यांची नितांत गरज आहे. त्याचबरोबर 'आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या निर्मितीला पाठबळ' मिळण्यासाठीही राजकीय पक्षांच्या कार्यकर्ते – पदाधिकारी – लोकप्रतिनिधी यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारी कोणतीही औपचारिक संस्थात्मक व्यवस्था आज तरी उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर नेमकी गरज लक्षात घेऊन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी गेली ४२ वर्षे 'राजकीय नेतृत्व प्रशिक्षण' या क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहे.

## प्रशिक्षणाचे स्वरूप

- वैचारिक पाया बळकट करणारे.
- नेतृत्व क्षमतांचे संवर्धन करणारे.
- सुशासनविषयक दृष्टीकोन विकसित करणारे.
- प्रात्यक्षिकांतून कार्य-कौशल्य वाढविणारे.
- पुढील वाटचालीची स्पष्टता देणारे.
- व्यक्ती विकासातून संघटना विकास साधणारे.

## कालावधी व संख्या

- प्रशिक्षण वर्ग / शिबिरांचा कालावधी – २ किंवा ३ दिवस.
- किमान ५० ते कमाल १०० संख्येचे प्रशिक्षण वर्ग होणे अपेक्षित.

## प्रशिक्षण कोणासाठी

- तालुकास्तरावरील राजकीय कार्यकर्ते-पदाधिकारी
- जिल्हास्तरावरील राजकीय कार्यकर्ते-पदाधिकारी
- राज्यस्तरावरील राजकीय कार्यकर्ते-पदाधिकारी
- नगरसेवक, जिल्हा परिषद-पंचायत समिती-ग्रामपंचायत सदस्य
- खासदार व आमदार
- मंत्रिमंडळ सदस्य
- लोकप्रतिनिधींचे स्वीय साहाय्यक
- निवडणूक व्यवस्थापन प्रमुख
- समाजमाध्यमे आणि प्रचार-प्रसिद्धी प्रमुख
- कार्यालय प्रमुख

# तालुका-जिल्हा-राज्य स्तरावरील प्रशिक्षण

वैचारिक दृष्टिकोनातून सजग, राजकीय व सामाजिक कार्यासाठी सक्षम आणि विविध आधुनिक कौशल्यांसह सुसज्ज कार्यकर्ता 'तयार होण्यासाठी' हे प्रशिक्षण नक्की उपयुक्त ठरेल. तालुका-जिल्हा-राज्य स्तरावरील प्रामुख्याने संघटनात्मक कार्य करणारे कोणत्याही पक्षाचे कार्यकर्ते – पदाधिकारी हे पक्षाचा कणा असतात. लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यामधील दुवा म्हणून ते कार्यरत असतात. पक्ष संघटनेचा विस्तार, पक्षाच्या धोरणांचा प्रचार-प्रसार, कायदे-योजनांचा अभ्यास, कार्यालय व्यवस्थापन आणि निवडणूक काळातील नियोजन अशी अनेक कामे हे पदाधिकारी करीत असतात.

ही महत्त्वपूर्ण कामे करणाऱ्या कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना कायद्यांपासून ते कार्यालय व्यवस्थापनापर्यंत आणि भाषणकलेपासून ते AI तंत्रज्ञानापर्यंत विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक ठरते.

## १. तालुका स्तरावरील प्रमुख राजकीय कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- राजकीय कार्यकर्ता-पदाधिकारी म्हणून आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- मतदारसंघाची बांधणी (विधानसभा / जिल्हा परिषद गट / पंचायत समिती गट / ग्रामपंचायत)
- स्थानिक उपक्रमशीलता
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- जिल्हा परिषद - पंचायत समिती - ग्रामपंचायत स्तरावरील निवडक यशस्वी योजना
- ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरपालिका – संबंधित कायदे
- तालुका स्तरावरील प्रशासन आणि नगरपालिका प्रशासन यांच्याशी संपर्क व समन्वय
- राज्यघटनेची तोंडओळख
- निवडणूक व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- AI तंत्रज्ञानाची ओळख
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- नेतृत्व विकास
- संवाद कौशल्ये
- भाषणकला / वक्तृत्वकला
- कार्यालय व्यवस्थापन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- ओळख आपल्या तालुक्याची
  (इतिहास, राजकीय इतिहास, भूगोल, पर्यटन, लोकसंख्या, मतदार, आरोग्यविषयक व शैक्षणिक माहिती, अर्थ व उद्योगविषयक माहिती, सांस्कृतिक वैशिष्ट्ये... इ.)

## २. जिल्हा स्तरावरील प्रमुख राजकीय कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- राजकीय कार्यकर्ता-पदाधिकारी म्हणून आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- मतदारसंघाची बांधणी (विधानसभा / जिल्हा परिषद गट / पंचायत समिती गट / ग्रामपंचायत)
- स्थानिक उपक्रमशीलता
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- महानगरपालिका - नगरपालिका - जिल्हा परिषद स्तरावरील निवडक यशस्वी योजना
- महानगरपालिका - नगरपालिका - जिल्हा परिषद संबंधित कायदे
- निवडणूक व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- AI तंत्रज्ञानाची ओळख
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- नेतृत्व विकास
- संवाद कौशल्ये
- भाषणकला / वक्तृत्वकला
- कार्यालय व्यवस्थापन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- ओळख आपल्या जिल्ह्याची
  (इतिहास, राजकीय इतिहास, भूगोल, पर्यटन, लोकसंख्या, मतदार, आरोग्यविषयक व शैक्षणिक माहिती, अर्थ व उद्योगविषयक माहिती, सांस्कृतिक वैशिष्ट्ये... इ.)

## ३. राज्यस्तरावरील राजकीय पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- राजकीय पदाधिकारी म्हणून आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची बांधणी
- कार्यक्षेत्रातील उपक्रमशीलता
- खासदार आणि आमदार निधीचे नियोजन
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- विविध राज्यांतील निवडक यशस्वी योजना / प्रकल्प
- निवडणूक व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- वॉर रूम व्यवस्थापन
- नेतृत्व विकास
- संवाद कौशल्ये
- भाषणकला / वक्तृत्वकला
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- जगाला किंवा देशाला भेडसावणाऱ्या समस्या (पाणी, पर्यावरण, शेती, स्थलांतर...इ.) आणि त्यांवरील उपाययोजना
- ओळख आपल्या राज्याची (इतिहास, राजकीय इतिहास, भूगोल, पर्यटन, लोकसंख्या, मतदार, आरोग्यविषयक व शैक्षणिक माहिती, अर्थ व उद्योगविषयक माहिती, सांस्कृतिक वैशिष्ट्ये... इ.)












# विविध स्तरांवरील लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण

लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे विविध स्तरांवरील लोकप्रतिनिधी! ग्रामपंचायत सदस्य ते खासदारांपर्यंत बहुमताने निवडून येऊन राजकीय कार्यकर्ते लोकप्रतिनिधी बनतात. तथापि निवडणुका हे अंतिम साध्य नसून, ते लोकशाही सक्षमीकरणाचे आणि सर्वांगीण विकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे, याचे सर्वांना भान असणे गरजेचे आहे. निवडून आल्यानंतरची वाटचाल हे खरे आव्हान!

म्हणूनच ग्रामपंचायत ते मंत्रिमंडळ सदस्य अशा सर्वच स्तरांवरील लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणानंतरच संबंधित विषयांचे ज्ञान व माहिती प्राप्त होईल आणि विकासाची प्रक्रिया गतिमान होऊन नेतृत्व सर्वमान्य होईल.

## ४. नगरसेवक, जिल्हा परिषद-पंचायत समिती-ग्रामपंचायत सदस्यांसाठी प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- मतदारसंघ विकासाची (शहर / ग्रामविकासाची) नेमकी संकल्पना
- महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था - संबंधित कायदे
- विविध समित्या आणि संबंधित कामे
- सुशासन – आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- लोकप्रतिनिधी आणि विविध स्तरांवरील प्रशासन – संपर्क आणि समन्वय
- सभेच्या कामकाजातील आपली कामगिरी
- अर्थसंकल्पाचा अभ्यास आणि निधीचे नियोजन
- मनपा / नगरपालिका / ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था - निवडक यशस्वी योजना / प्रकल्प
- मतदारसंघ बांधणी
- स्थानिक उपक्रमशीलता
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- राज्यघटनेची तोंडओळख
- निवडणूक व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- नेतृत्व विकास
- संवाद कौशल्ये
- भाषणकला / वक्तृत्वकला
- कार्यालय व्यवस्थापन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन


















## ५. खासदार व आमदार यांच्यासाठी प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- मतदारसंघ विकासाची (शहर / ग्रामविकासाची) नेमकी संकल्पना
- जगाला किंवा देशाला भेडसावणाऱ्या समस्या (पाणी, पर्यावरण, शेती, स्थलांतर...इ.) आणि त्यांवरील उपाययोजना
- सुशासन – आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- लोकप्रतिनिधी आणि विविध स्तरांवरील प्रशासन – संपर्क आणि समन्वय
- विधिमंडळातील किंवा संसदेतील कामगिरी
- केंद्रीय किंवा राज्याच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास आणि निधीचे नियोजन
- महाराष्ट्रासह विविध राज्यांतील निवडक यशस्वी योजना / प्रकल्प
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- कार्यक्षेत्रातील उपक्रमशीलता
- मतदारसंघ बांधणी
- निवडणूक व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन
- वॉर रूम व्यवस्थापन
- नेतृत्व विकास
- संवाद कौशल्ये
- वेळेचे नियोजन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- कार्यालय व्यवस्थापन आणि मनुष्यबळ नियोजन






## ६. लोकप्रतिनिधींच्या स्वीय साहाय्यकांसाठी प्रशिक्षण

आमदार, खासदार आणि मंत्री स्तरावरील लोकप्रतिनिधींना लोकहित, विकास आणि सुशासनाबाबत सातत्याने कार्यरत आणि दक्ष असावे लागते. त्यांच्या कामामध्ये तसेच त्यांच्या प्रतिमा निर्मितीमध्येही 'स्वीय साहाय्यक' हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो. एक कार्यकुशल, समजूतदार, समस्यांची जाणीव व गांभीर्य असलेला, उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेला, हरहुन्नरी आणि 'प्रशिक्षित स्वीय साहाय्यक' लाभणे ही लोकप्रतिनिधींसाठी एक अत्यंत आवश्यक बाब ठरते.

### सत्रांचे विषय

- स्वीय साहाय्यकांची नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- विविध स्तरांवरील प्रशासन – संपर्क आणि समन्वय
- लोकप्रतिनिधींची विधिमंडळातील किंवा संसदेतील कामगिरी – कामकाज प्रक्रिया, कायदे, विधेयके, नियम, संकेत, प्रश्न यांचा अभ्यास.
- केंद्रीय किंवा राज्याच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास
- खासदार किंवा आमदार यांच्या निधीच्या नियोजनाचा अभ्यास
- मतदारसंघासाठी उपयुक्त निवडक यशस्वी योजना / प्रकल्प
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- AI तंत्रज्ञानाची ओळख
- संवाद कौशल्ये
- वेळेचे नियोजन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- कार्यालय व्यवस्थापन आणि मनुष्यबळ नियोजन












## ७. मंत्रिमंडळ सदस्यांसाठी प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- विकसित भारत @ २०४७
- सुशासन – आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- जगाला किंवा देशाला भेडसावणाऱ्या समस्या (पाणी, पर्यावरण, शेती, स्थलांतर...इ.) आणि त्यांवरील उपाययोजना
- मंत्री आणि मंत्रालयीन व विविध स्तरांवरील प्रशासन – संपर्क आणि समन्वय
- विधिमंडळातील कामगिरी
- अर्थसंकल्पाचा अभ्यास आणि निधीचे नियोजन
- विविध राज्यांतील निवडक यशस्वी योजना / प्रकल्प
- मतदारसंघ विकासाची नेमकी संकल्पना
- विभाग / खाते आणि उपक्रमशीलता
- उपग्रह तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्राच्या विकासात वापर
- निवडणूक व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन
- वॉर रूम व्यवस्थापन
- नेतृत्व विकास
- संवाद कौशल्ये
- वेळेचे नियोजन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- कार्यालय व्यवस्थापन आणि मनुष्यबळ नियोजन






## विशेष पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण

सोशल मीडियाने (समाजमाध्यमांनी) संपूर्ण जग आणि मानवी जीवन व्यापून टाकले आहे. राजकीय क्षेत्रही याला अपवाद नाही. प्रत्येक पक्ष समाजमाध्यमांचा प्रचार-प्रसारासाठी वापर करतो. परंतु नेमका आणि प्रभावी वापर करून समाजमाध्यमांवर सकारात्मक पकड मिळवण्यासाठी त्याबद्दलच्या तंत्र आणि मंत्राचे प्रशिक्षण संबंधित पदाधिकाऱ्यांना देणे गरजेचे आहे.

राजकीय पक्ष ही एक मोठी व्यवस्था आहे. त्यामध्ये कार्यकर्त्यांसह (मनुष्यबळासह) अन्य घटकांचे व्यवस्थापनही करावे लागते. पक्षाचे कार्यालय हे पक्षातील सर्व घटकांना एकत्र बांधणारे सूत्र! म्हणून कार्यालयाचे व्यवस्थापन आणि संबंधित मनुष्यबळाचे नियोजन यांकडे आवर्जून लक्ष द्यावेच लागते. निवडणुका हा एका अर्थाने लोकशाहीतील उत्सवच मानला जातो. भारतासारख्या खंडप्राय आणि वैविध्यपूर्ण देशात तुरळक अपवाद वगळता सर्व स्तरांवरील निवडणुका शांत आणि मुक्त वातावरणात पार पडतात. अर्थातच, राजकीय पक्षही हिरीरीने निवडणुका लढवतात. या पार्श्वभूमीवर निवडणूक जिंकण्याचे तंत्र – मंत्र - शास्त्र यांसह आचारसंहितेपासून ते मतमोजणीपर्यंतच्या विविध पर्यायांचे प्रशिक्षण लोकशाहीचा लौकिक वाढवणारेच ठरेल.

## ८. समाजमाध्यमे आणि प्रचार-प्रसिद्धी प्रमुखांसाठी प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- आशयाची निर्मिती (कंटेंट क्रिएशन)
- सायबर सुरक्षा
- सायबर कायदे
- निवडणूक काळातील कामांचे व्यवस्थापन
- वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या - संपर्क, समन्वय आणि व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर (सर्व मीडिया Handles बाबत)
- माझे कार्यक्षेत्र, माझा YouTube चॅनेल
- AI तंत्रज्ञानाचा नेमका वापर
- वॉर रूम व्यवस्थापन
- संवाद कौशल्ये
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन









## ९. कार्यालय प्रमुखांसाठी प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- कार्यालय व्यवस्थापन
- आर्थिक व लेखाविषयक नियोजन, संबंधित नियम – कायदे
- कार्यालयातील उपक्रमशीलता
- निवडणूक काळातील कार्यालय व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- AI तंत्रज्ञानाची ओळख
- वॉर रूम व्यवस्थापन
- संवाद कौशल्ये
- भाषणकला / वक्तृत्वकला
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन

## १०. निवडणूक व्यवस्थापन प्रमुखांसाठी प्रशिक्षण

### सत्रांचे विषय

- आपली नेमकी भूमिका आणि जबाबदारी
- आचारसंहिता आणि संबंधित कायदे व नियम
- निवडणूक व्यवस्थापन
- निवडणूक काळात विविध स्तरांवरील प्रशासनाशी संपर्क आणि समन्वय
- निवडणूक काळातील आर्थिक नियोजन आणि लेखाविषयक कामे
- प्रचार-प्रसार आणि प्रसिद्धीचे नियोजन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर
- वॉर रूम व्यवस्थापन
- प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन
- AI तंत्रज्ञानाची ओळख
- संवाद कौशल्ये
- वेळेचे नियोजन
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन
- कार्यालय व्यवस्थापन आणि मनुष्यबळ नियोजन

संपर्क

**विनय वसंत मावळणकर**
वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी
+91 9096548250 | vinaym@rmponweb.org

**अनिल पांचाळ**
साहाय्यक कार्यक्रम अधिकारी.
+91 9975415922 | anilp@rmponweb.org

# आमची उपलब्ध प्रकाशने

| प्रकाशनाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| संघटनशास्त्र ( सहावी आवृत्ती ) | संपादन : डॉ. विनय सहस्रबुद्धे | 150.00 |
| समीक्षा – संचित (निवडक इंग्रजी ग्रंथांच्या परीक्षणांचे संकलन ) | लेखक : ज.द.जोगळेकर<br>संपादन : रवींद्र साठे | 300.00 |
| आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम | मधुबन पिंगळे | 60.00 |
| मर्यादांवर मात करू !<br>विद्यार्थ्यांमधील शारीरिक आणि मानसिक अक्षमतांचे व उपायांचे विवेचन | क्षिप्रा रोहित | 50.00 |
| अध्ययन अक्षमता - समजून घेताना | क्षिप्रा रोहित | 50.00 |
| कर्णबधिरत्व - उपायांतून उमेदीकडे | क्षिप्रा रोहित | 50.00 |
| उत्तम शेती | विकास मुरलीधर राजर्षी | 100.00 |
| भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ?<br>( आवृत्ती : मराठी / हिंदी / इंग्रजी ) | अमित शाह | 30.00 |
| असू अम्ही सुखाने पत्थर पायातील...! | सुहास वैद्य | 100.00 |
| छत्तीसगडमधील अंतर्गत सुरक्षितता आणि विकास :<br>नक्षलवादी चळवळीचे परिणाम (अभ्यास अहवाल ) | अभ्यास अहवाल | 25.00 |
| राजनीति के उस पार (तृतीय आवृत्ती ) | संपादन : सुधीर नादगांवकर | 150.00 |
| संगठन कौशल ( चतुर्थ आवृत्ती ) | संपादन : डॉ. विनय सहस्रबुद्धे | 150.00 |
| सांस्कृतिक राष्ट्रवाद के शिल्पी | अमित शाह | 60.00 |
| Al-Qaeda (Global Terror Incorporated) | Sudhakar Raje | 50.00 |
| Left Front Rule in West Bengal :<br>Genesis, Growth and Decay | Dr. Ashok Modak<br>Atul Bhatkhalkar | 40.00 |
| Development and Internal Security in Chattisgarh :<br>Impact of Naxalite Movement | Rearch Report | 30.00 |
| Creativity In Cooperation (Four Success Stories) | Niranjan Welankar<br>Ravi Pokharna | 40.00 |
| War On Terrorism<br>(A Compilation of Seminar Papers) | Editor :Ravindra Sathe<br>Milind Arolkar | 30.00 |
| Understanding Human Computer :<br>System and Software | Arvind Bhaskar Rege | 120.00 |
| Including The Excluded<br>(A Study of the Impact of Contract Labour Act 1970) | S. M .Dharap | 150.00 |
| The National Cause :<br>(selected writings of S. G. Majgaonkar ) | Translation : Anand Agashe | 200.00 |
| Architects Of Cultural Nationalism | Amit Shah | 60.00 |

## प्रबोधिनीचा प्रशिक्षण परिसर

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ज्ञान-नैपुण्य केंद्र हे १५ एकरांचे हिरवाईने नटलेले आणि टेकड्यांच्या मधोमध वसलेले एक निसर्गसुंदर ठिकाण आहे. निवासी प्रशिक्षणाचा अविस्मरणीय अनुभव देणाऱ्या या शांत परिसरातील ग्रंथालय व इतर प्रशिक्षण सुविधा स्वयं-शिक्षणाला प्रेरणा देतात आणि मनाला अंतर्मुख करतात.

निवास | प्रशिक्षण सभागृहे | भोजन कक्ष | योग व इतर सुविधा











**मुंबई कार्यालय (नोंदणीकृत)**

१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,
मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ /
२४१८ ५५०२ / २४१५ ६७२५
ई मेल -rmpchanchal@rmponweb.org

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**

केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)
जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६
ई मेल -samparka@rmponweb.org

**दिल्ली कार्यालय**

१३६ नॉर्थ एव्हेन्यू, नवी दिल्ली – ११००११
दूरध्वनी : +९१ – ११ – २३०९ २०३२
ई मेल -rmpdelhi@rmponweb.org

**पुणे कार्यालय**

६२६, नारायण पेठ, लोखंडे तालीम शेजारी,
पुणे – ४११ ०३०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २० – २४४७ ३२७१
ई मेल -cibls@rmponweb.org


rmponweb.org | @rmponweb | rmponweb